# गुरुमाई चिद्विलासानंद यांचे जीवन व त्यांनी प्रदान केलेला दिव्य वारसा या विषयांवर एक व्याख्यान

मीरा लॉबा-झपीरो

श्री मुक्तानंद आश्रम
१ जून, २०१७

*सद्‌गुरुनाथ महाराज की जय!*

जून महिन्याचा पहिला दिवस! आनंदमय जन्मदिवसाचा अरुणोदय!

या अद्‌भूत, विलक्षण आणि विस्मयकारक 'आनंदमय जन्मदिवस' सत्संगामध्ये तुमच्यापैकी प्रत्येकाचे स्वागत करणे हे माझे महान सौभाग्य आहे.

*आमच्या गुरुमाई, आमचा सत्संग.*

माझे नाव मीरा लॉबा-झपीरो आहे. मी एक व्हिजिटिंग सेवाकर्ता आहे आणि त्याचबरोबर प्रेमोत्सव विभागामध्ये मी घरून सेवा अर्पण करते. या 'आनंदमय जन्मदिवस' सत्संगात सूत्रधार म्हणून सेवा अर्पित करताना मला अतिशय आनंद होतो आहे.

एका महान विभूतीच्या जन्माचा सन्मान करण्यासाठी निसर्ग जननी आपलीच अपूर्व प्रतिभा, आपलीच लक्षणीय सर्जनशीलता प्रदर्शित करते. असे पुन्हापुन्हा घडताना तुम्हाला आढळले नाही का?

काल रात्री जेव्हा आपण बाबांच्या जन्मदिवस महोत्सवाचे समापन करत होतो आणि 'आनंदमय जन्मदिवसाचा' उंबरा ओलांडण्याच्या तयारीत होतो तेव्हा निसर्गाने श्री मुक्तानंद आश्रमात एक अलौकिक देखावा प्रस्तुत केला.

आश्रमाच्या वर असलेले आकाश मेघमंडलाने आच्छादलेले होते. मोठे, श्वेत, हेलकावे घेणारे ढग विशाल निळ्या आकाशात मंद गतीने तरंगत होते. अस्ताला जाणारा सूर्य ढगांना पाठीमागून प्रकाशित करत होता ज्यामुळे ते गुलाबी आणि स्वर्णिम तेजाने चमकत होते. अर्धचंद्रही उदित होऊन चमकत होता.

केवळ इतकेच नाही! तुम्ही जर अगदी योग्य वेळी बाहेर पडला असाल तर तुम्हाला इंद्रधनुष्याचे दर्शनही झाले असेल. ते अप्रतिम होते — सायंकालीन आकाशात मखमली आणि धुसर रंगांची एक कमान ढगांमधून डोकावत होती.

मग जसजसे रात्रीचे आगमन होऊ लागले, तसतसे घनदाट निळे कृष्णवर्णी ढग श्री मुक्तानंद आश्रमावर जमू लागले; वीजा चमकू लागल्या, मेघगर्जना होऊ लागली आणि स्वर्गाची कवाडे खुली होऊन जोरदार पाऊस पडू लागला. आणि आज सकाळी सूर्योदयाच्या वेळी विशाल, निरभ्र, निळ्या आकाशात जेव्हा सूर्यदेवतेने आपले आसन ग्रहण केले तेव्हा स्वच्छ उजेड पसरलेला होता.

आपल्याला 'आनंदमय जन्मदिवसात' घेऊन जाण्याची किती अद्भुत रीत! निसर्ग सदैव जाणतो.

सिद्धयोग मार्गावर, कोणाचाही जन्मदिवस म्हणजे त्यांचा चांगुलपणा, स्नेहशीलता, त्यांचे योगदान, मूल्य आणि त्यांच्या अनेक गुणांचा उत्सव साजरा करण्याची संधी असते.

तेव्हा, जरा कल्पना करा आपल्या श्रीगुरू गुरुमाई चिद्विलासानंद यांच्या वाढदिवसाचा उत्सव साजरा करण्याची... होय! क्षणभर कल्पना करा. विचार करा की, तुमच्यासाठी याचा काय अर्थ आहे.

या वर्षी, 'आनंदमय जन्मदिवसाचा' शुभारंभ कसा केला जावा आणि संपूर्ण जून महिनाभर हा महोत्सव कसा साजरा करावा यासाठी तीन सिद्धयोगींनी एक अद्भुत कल्पना मांडली. या तिन्ही सिद्धयोगी बालपणापासूनच सिद्धयोगाच्या शिकवणींचा अभ्यास आणि सेवा करत आल्या आहेत.

कॅलिफोर्नियाच्या एल सोब्रान्ते येथील गरिमा बोरवणकर, कॅलिफोर्नियाच्या रेनचोझे पेनेस्कीतोझ्, येथील वाणी अग्रवाल आणि ऑस्ट्रेलियाच्या साउथ यारा येथील लीलावती स्टुंअर्ट यांनी एस. वाय. डी. ए. फाउंडेशनच्या लाईव्ह इव्हेंट्स् विभागाकडे, [तो विभाग जो सत्संगाचे आयोजन करतो] ज्या प्रसंगांमधून त्यांना गुरुमाईंकडून प्रत्यक्ष रूपात शिकवणी प्राप्त झाल्या ते प्रसंग सांगण्याची त्यांची इच्छा व्यक्त केली.

लाईव्ह इव्हेंट्स् विभागातील सेवाकर्त्यांसमोर जेव्हा हा प्रस्ताव आला तेव्हा त्यात दडलेल्या अगाध संभावना त्यांनी ओळखल्या. गुरुमाईंसोबत घडलेल्या प्रसंगांविषयी इतरांना सांगणे, हे त्यांच्या दिव्य

वारश्याचा एक भाग बनते आणि त्याचबरोबर यामुळे गुरुमाईंविषयी असलेल्या आपल्या प्रेमाला एक यथार्थ रूप प्राप्त होते. तसेच, जेव्हा हे सिद्धयोगी गुरुमाईंसोबतचे आपले जीवन रूपांतरीत करणारे प्रसंग सांगतील तेव्हा ते प्रसंग इतरांनाही तसेच करण्याची प्रेरणा देतील.

लाईव्ह इव्हेंट्स् विभागातील सेवाकर्त्यांना असेही वाटले की, जर श्री मुक्तानंद आश्रमातील प्रत्येकाने आपल्या स्मृतींच्या साठ्यातून गुरुमाईंसोबतचे प्रसंग आठवून ते प्रसंग इतरांना सांगण्यासाठी तयार केले आणि या उपहारासाठी आपले योगदान केले, तर ते अत्यंत विस्मयजनक असेल — असा उपहार जो येणाऱ्या पिढ्यांसाठी शक्तीपुंजचा एक ठेवा बनेल.

म्हणून लाईव्ह इव्हेंट्स् विभागाने असे प्रसंग व अनुभव सांगण्यासाठी सत्संगांची एक शृंखला तयार केली, जे सत्संग श्री मुक्तानंद आश्रमात जून २०१७ मध्ये संपूर्ण महिनाभर आयोजित केले जातील. या शृंखलेचे शीर्षक आहे :

**सुरभी, स्मरण, अभिज्ञान**

गुरुमाई चिद्विलासानंद यांचे जीवन आणि त्यांनी प्रदान केलेला दिव्य वारसा

या सत्संगांमध्ये आपण श्रीगुरुमाईंकडून प्रत्यक्षपणे शिकवणी प्राप्त होण्याविषयी असलेले अनोखे प्रसंग व अनुभव ऐकणार आहोत. यांच्यापैकी अनेक अनुभव सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर प्रकाशित केले जातील, जेणेकरून सार्वभौमिक संघम्‌देखील ते वाचू शकेल. यामुळे विश्वभरातील सिद्धयोगींना आणि नवीन जिज्ञासूंनादेखील गुरुमाईंविषयीच्या त्यांच्या गोष्टी लिहिण्यास व सांगण्यास मदत मिळेल.

सुरभी, स्मरण, अभिज्ञान — हे शब्द, गुरुमाईंविषयीच्या आपल्या गोष्टी सांगण्याच्या अनुभवाचे वर्णन करतात.

> ‘सुरभी’ म्हणजे एक मधुर आणि प्रफुल्लित करणारा सुगंध. एक सुगंध एखादी स्मृती आपल्या मनःचक्षुंसमोर पूर्णपणे आकाराला येण्यापूर्वीच, गतकाळातील आपल्या एखाद्या अनुभवाला त्याच्या सूक्ष्म भावासह आणि प्रेरणेसह क्षणार्धात जागृत करू शकतो. आपल्या सर्वात गहिऱ्या स्मृतींना जागृत करण्यासाठी सुगंध अत्यंत महत्त्वपूर्ण ठरू शकतो.
>
> आणि ‘सुगंध’ हा शब्द या वर्षी आपल्याकरता विशेष महत्त्वाचा आहे, कारण . . . वर्ष २०१७ साठी असलेला श्रीगुरुमाईंचा संदेश!

वर्ष २०१७ साठी श्रीगुरुमाईंचा संदेश आहे :

दिव्य हृदयाचा सुगंध आपल्या श्वासात भरून घ्या.
परम आत्म्याच्या प्रकाशात मुदित व्हा.
दिव्य हृदयाच्या कल्याणकारी शक्तीसह आपला प्रश्वास मृदुलतेने प्रवाहित होऊ द्या.

'स्मरण'—गुरुमाईंकडून आपल्याला प्राप्त झालेल्या शिकवणींचे स्मरण करून आपण केवळ आपल्या हृदयात गुरुमाईंशी जोडले जातो असे नाही, तर आपण या स्मृतीचे जतन करतो जेणेकरून इतरजणदेखील ती ग्रहण करू शकतील आणि त्यातून शिकू शकतील. ती एक जिवंत स्मृती बनते आणि श्रीगुरुमाईंचा जिवंत दिव्य वारसा बनते.

'अभिज्ञान'—इतरांनी सांगितलेल्या गोष्टी जेव्हा आपण आपल्या अंतरात उतरवतो तेव्हा त्या गोष्टी आपल्या अंतरात एक अभिज्ञान करवतात, त्या आपल्याला एक बोध करवून देतात की, कशा प्रकारे गुरुमाईंच्या कृपेने आपल्याला स्पर्श केला आहे. त्या गोष्टी साधनेतील आपल्या अनुभवांना दृढता प्रदान करतात, त्यांची पुष्टी करतात. आपल्याला अभिज्ञान होते! या अभिज्ञानाने अंतरात एक किमया घडू लागते.

**सुरभी, स्मरण, अभिज्ञान**

गुरुमाई चिद्विलासानंद यांचे जीवन आणि त्यांनी प्रदान केलेला दिव्य वारसा

आता मी तुम्हाला श्रीगुरुमाईंचे जीवन आणि त्यांनी प्रदान केलेला दिव्य वारसा यांच्याविषयीचे काही पैलू सांगू इच्छिते.

☼

तो २४ जूनचा दिवस होता जेव्हा दक्षिण भारतातील समुद्र किनाऱ्याजवळ वसलेल्या, मंगळुरू शहराच्या निकट असलेल्या एका पर्वत-पायथ्याशी आपल्या परमप्रिय गुरुमाईंनी जन्म घेतला. त्या दिवशी हवेमध्ये किती मधुर सुगंध दरवळला असेल; सारा आसमंत किती अलौकिक रंगांनी सजला असेल! भारताच्या महाकाव्यांमध्ये, महान आत्म्यांच्या जन्माच्या सन्मानार्थ नेहमीच देवी-देवतांना स्वर्गातून पुष्पवृष्टी करताना चित्रित केले जाते. जेव्हा मी गुरुमाईंच्या या धरतीवर अवतरित होण्याविषयी विचार करते, तेव्हा माझ्याही मनात तसेच चित्र उभे राहते.

गुरुमाई एक जगद्‌गुरू आहेत — त्या संपूर्ण जगतासाठी एक सदेह सिद्धगुरू आहेत. वर्ष १९८२ पासून श्रीगुरुमाई सिद्धयोग मार्गाच्या श्रीगुरू आहेत. गेली पस्तीस वर्षे गुरुमाई विश्वभरातील विविध देशांच्या व संस्कृतीच्या, जीवनातील विविध क्षेत्रांतून येणाऱ्या, प्रत्येक वयोगटाच्या जिज्ञासूंना शक्तिपात दीक्षा प्रदान करत आहेत, आपले ज्ञान प्रदान करत आहेत आणि ध्यानाच्या शिकवणी प्रदान करत आहेत.

तीन दशकांच्या कालावधीत, गुरुमाईंनी 'टीचिंग व्हिज़िट्स्'च्या माध्यमातून विश्वभर यात्रा केल्या आहेत. गुरुमाईंनी सोळा देशातील १६८ शहरांना भेटी दिल्या आहेत आणि लोकांचा त्यांच्याच शहरांमध्ये सिद्धयोग मार्गाशी परिचय करवून दिला आहे. या यात्रांच्या दरम्यान कॉन्फरन्स हॉल्स्‌मध्ये, हॉटेल्स्‌मध्ये आणि खुल्या मैदानांवर उत्कृष्ट आणि अत्यंत स्वच्छ सत्संग हॉल निर्माण केले गेले. शाब्दिक व भौतिक अर्थाने पाहिले तर, गुरुमाईंसोबत झालेल्या सत्संगांनी आणि ध्यानशिबीरांनी त्या स्थानांना पवित्र केले जिथे हजारो लोकांनी सिद्धयोगाचे अभ्यास केले.

तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीसह, जिज्ञासूंना सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटच्या माध्यमातून या जगातील गुरुमाईंच्या दिव्य कार्याची झलक मिळते. वेबसाईटच्या माध्यमातून नवीन जिज्ञासूंना सिद्धयोग शिकवणींचा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन मिळते आणि अनुभवी जिज्ञासू गुरुमाईंची कृपा व त्यांच्या आशीर्वादांशी असलेले आपले नाते बळकट करतात.

सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटखेरीज, गुरुमाईंच्या शिकवणी, प्रकाशित केलेल्या त्यांच्या प्रवचनांच्या आणि लेखांच्या विशाल संग्रहाच्या रूपात संग्रहीत केल्या गेल्या आहेत. श्रीगुरुमाईंचे प्रज्ञान हे एस. वाय. डी. ए. फाउंडेशन आणि गुरुदेव सिद्धपीठ यांच्याद्वारे वीस पुस्तकांमधून आणि शेकडो पत्रिकांमधील लेखांमधून सर्वांसाठी उपलब्ध करून दिले गेले आहे. या प्रकाशित झालेल्या साहित्यकृतींमध्ये, गुरुमाईंनी मानवी स्वभावाविषयी असलेल्या त्यांच्या अद्वितीय ज्ञानाद्वारे आपल्यासाठी परमसत्याकडे घेऊन जाणाऱ्या एक सेतूची निर्मिती केली आहे, ज्याच्याविना ते सत्य अज्ञातच राहिले असते. आणि गुरुमाईंच्या काव्यात, मनाच्या पलीकडे जाऊन, हृदयाची गहिरी अभिलाषा व्यक्त करण्याच्या त्यांच्या दैवप्रेरित सामर्थ्याचा परिचय मिळतो.

गुरुमाईंच्या अद्‌भुत आणि हृदयाला खुले करणाऱ्या रचनांनी प्रत्येक वयोगटातील लोकांना भारावून टाकले आहे आणि भविष्यातदेखील ते असे होत राहील.

आपल्याला लिखित स्वरूपात श्रीगुरुमाईंचे शब्द प्राप्त आहेत, केवळ त्यामुळे आपण भाग्यवान आहोत असे नाही तर, त्यांच्या वाणीचा ध्वनीदेखील आपण ऐकू शकतो, त्यांच्या अत्युत्कृष्ट संगीतरचना आपण ऐकू शकतो. गुरुमाईंनी सिद्धयोग नामसंकीर्तन, भजन, स्तोत्र आणि आरती यांचा समावेश असलेल्या १५०हूनही अधिक संगीतरचना केल्या आहेत. गाणाऱ्याने आणि श्रवण करणाऱ्याने स्वतःच्या अस्तित्वात आदिनादाचे स्पंदन अनुभवावे या उद्देशाने गुरुमाई त्यांच्या प्रत्येक संगीतरचनेला अनुप्राणित करतात. गुरुमाईंनी सिद्धयोग मार्गाचे अनुसरण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी सिद्धयोग संगीत हा एक मुख्य अभ्यास बनवला आहे, मग त्या व्यक्तीचे संगीतातील कौशल्य आणि ज्ञान कितीही असो. गुरुमाईंनी सर्वांच्या हृदयाचे गीत जागृत केले आहे.

गुरुमाईंनी मुलांकडे अत्यंत प्रेमपूर्ण आणि खास लक्ष दिले आहे, तसेच मुलांना त्यांच्या स्वतःच्या हृदयातील पवित्रतेच्या संपर्कात राहता यावे यासाठी गुरुमाईंनी असंख्य मार्ग निर्माण केले आहेत. एक उत्कृष्ट दृश्य जे आपल्याला आढळते ते म्हणजे, गुरुमाई एका मुलासोबत बसल्या आहेत, त्याला प्रश्न विचारत आहेत, त्याला त्याचे उपजत प्रज्ञान आणि त्याचे सद्‌गुण प्रकट करता यावेत यासाठी त्याला मार्गदर्शन करत आहेत जेणेकरून तो, ते प्रज्ञान आणि सद्‌गुण यांच्यावर आयुष्यभर विसंबून राहू शकेल.

वर्ष १९९८ मध्ये, गुरुमाईंनी Golden Tales [गोल्डन टेल्स्] नामक नाट्यमालिकेचा प्रारंभ केला. त्या दरम्यान श्री मुक्तानंद आश्रमात होणाऱ्या सिद्धयोग पारिवारिक रिट्रीट्स्‌मध्ये भाग घेणाऱ्या बालकांनी आणि किशोरांनी या नाटिकांमध्ये अभिनय केला होता. या नाटिकांच्या माध्यमातून बालकांना आणि युवांना देवी-देवतांविषयी आणि संतांच्या जीवनाविषयीचे ज्ञान मिळाले. या नाटिकांमध्ये अभिनय करण्याच्या सेवेने मुलांमध्ये अशी क्षमता विकसित झाली की, जिच्यामुळे ते आपले सर्वोत्कृष्ट अर्पण करू शकतील व आपल्या सेवेच्या अमृतमय फलश्रुतीचा अनुभव घेतील. आजदेखील सिद्धयोगी सांगतात की, 'गोल्डन टेल्स्'च्या नाटकांमध्ये अभिनय करणे हा कसा त्यांच्या संगोपनातील व मोठे होण्यातील एक महत्त्वाचा टप्पा होता आणि हेदेखील सांगतात की, 'गोल्डन टेल्स्' पाहणे ही कशी त्यांच्यासाठी अशी एक आठवण आहे की, जी ते कधीही विसरणार नाहीत.

आणखी एक माध्यम ज्याद्वारे गुरुमाई विश्वभरातील लोकांच्या हृदयांपर्यंत पोहोचतात ते आहे, त्यांचा पत्रव्यवहार. जे लोक त्यांना पत्र लिहितात त्यांच्या प्रार्थनांना गुरुमाई ज्या काळजीपूर्वकपणे व आत्मीयतेने उत्तरे देतात, ते अतुलनीय आहे.

गुरुमाईंनी लाखोंच्या संख्येतील पत्रे वाचण्यासाठी आणि त्यांना उत्तरे देण्यासाठी दिलेल्या वेळेची तुम्ही कल्पना करू शकता का? —प्रौढ व्यक्तींची पत्रे, बालक आणि युवांची पत्रे, कैदेत असलेल्या लोकांची पत्रे, गहन कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या सगळ्या लोकांची पत्रे, इत्यादी.

गुरुमाईंचा संपूर्ण पत्रव्यवहार हे एक महासाहित्य आहे, ज्यामध्ये त्यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि त्यांचे आशीर्वाद निहित आहेत, तो गुरु-शिष्य संबंधाच्या माहात्म्याची गाथा आहे. तो गुरुमाईंच्या अनंत प्रेमाच्या आणि करुणेच्या माहात्म्याची गाथा आहे.

विश्वातील अतिशय दुःखद घटनांच्या किंवा मोठ्या समस्यांच्या प्रसंगांमध्येही गुरुमाईंनी आपल्याला पुढे जाण्याचा मार्ग दाखवला आहे. गुरुमाईंनी आपल्याला याबद्दल शिकवले आहे की, जेव्हा सर्वांचा संकल्प एकच असतो तेव्हा त्यात अत्याधिक शक्ती असते, ज्यामुळे वस्तुतः सर्वत्र एकोप्याचा विकास होतो तसेच निसर्गाचा आणि आपल्या समाजाचा विकास होतो; गुरुमाईंनी प्रार्थना व आशीर्वाद अर्पण करण्यासाठी सिद्धयोग संघम्ला मार्गदर्शन केले आहे.

वर्ष २००१मध्ये, गुरुमाईंनी वैश्विक समुदायाच्या सन्मानार्थ सत्संग आयोजित केले होते. या सत्संगांचे विशेष केंद्रण होते— हे जाणणे की, आपल्या सर्वांची मानवता एकच आहे आणि हेदेखील की, सर्वाधिक कठीण प्रसंगांना सामोरे जाताना आपण आपल्या सिद्धयोग साधनेच्या फळांचा आसरा घ्यावा.

गुरुमाईंचे संपूर्ण जीवन सिद्धयोगाच्या शिकवणींप्रति आणि लोकांना परमसत्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्यासाठी समर्पित आहे. हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी, गेल्या पस्तीस वर्षांत गुरुमाईंनी एस. वाय. डी. ए. फाउंडेशनमधील सेवाकर्त्यांना सेवेच्या आध्यात्मिक अभ्यासाकरता तत्त्वे आणि मार्गदर्शन

प्रदान केले आहे. प्रज्ञानाचे हेच भांडार फाउंडेशनच्या कार्याच्या केंद्रस्थानी आहे आणि त्याच्या अविश्वसनीय प्राप्तींचा स्रोत आहे.

एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, सार्वभौमिक सिद्धयोग अभियानाची [मिशनची] प्रमुख संस्था आहे आणि तिचा उद्देश आहे, सिद्धयोगाच्या शिकवणींचे संरक्षण करणे, जतन करणे आणि त्यांचा प्रसार करण्यास मदत करणे. गुरुमाईंनी फाउंडेशनमधील सेवाकर्त्यांना शिकवले आहे की, त्यांनी नेतृत्वाच्या या भूमिकेचा अंगीकार करावा आणि हे करण्यासाठी त्यांनी सेवेमध्ये एकतेचा भाव ठेवावा. सेवाकर्ते जेव्हा गुरुमाईंची तत्त्वे आणि मार्गदर्शन आत्मसात् करतात व आचरणात आणतात तेव्हा त्यांच्या प्रयत्नांचे परिणाम संपूर्ण संघम्‌मध्ये पसरतात.

☼

मानवतेसाठी असलेली गुरुमाईंची दृष्टी 'प्रसाद प्रॉजेक्ट' नामक धर्मार्थ कार्याच्या रूपातूनही व्यक्त झाली आहे, 'प्रसाद'चा या वर्षी २५वा वर्धापन दिवस साजरा होत आहे. 'प्रसाद' [PRASAD] च्या इंग्रजी अक्षरांचे पूर्ण रूप आहे — फिलॅन्थ्रॉपिक रिलीफ ऑल्ट्रूइस्टिक सर्विस अँड डिव्हेलपमेन्ट [Philanthropic Relief Altruistic Service And Development].

'प्रसाद' योजना आणि तिची भारतातील सहसंस्था 'प्रसाद चिकित्सा' यांचा प्रारंभ गुरुमाईंनी अनुक्रमे वर्ष १९९२ आणि १९९४ मध्ये केला होता. या संस्था, गुरुमाईंची करुणा आणि उदारता यांचे मूर्त रूप आहेत. या संस्थांमुळे हजारो लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आहे. गुरुमाईंच्या मार्गदर्शनाने कार्यरत असलेली 'प्रसाद', ही प्रभावशाली परिणामासाठी प्रशंसापात्र असलेल्या धर्मादाय संस्थांपैकी एक संस्था म्हणून टिकून आहे.

☼

भारताच्या प्राचीन शास्त्रग्रंथांमधील निहित ज्ञानाविषयी असलेल्या असीम आदरापोटी गुरुमाईंनी वर्ष १९९७ मध्ये 'मुक्तबोध भारतीय प्राच्य विद्या संशोधन संस्था' [मुक्तबोध इन्डॉलॉजिकल रीसर्च इन्स्टिट्यूट] हिचा शुभारंभ केला. या संस्थेच्या कार्याच्या माध्यमातून तीनशेच्या वर शास्त्रग्रंथ सुरक्षित ठेवले गेले आहेत व त्यांचे जतन केले गेले आहे, जे अन्यथा या जगतातून लुप्त झाले असते. यांच्यापैकी अनेक ग्रंथ मुक्तबोधच्या डिजीटल लायब्ररीद्वारे जनसामान्यांसाठी उपलब्ध केले गेले आहेत. आजही मुक्तबोधचे बहुमोल कार्य दर दिवशी सुरू आहे. याच्या परिणामस्वरूप आता त्या दुर्मिळ आणि अनमोल

शास्त्रग्रंथांना संरक्षित ठेवण्यासाठी एक संग्रहालय तयार झाले आहे, ज्यामुळे हे ग्रंथ आता सहजतेने उपलब्ध आहेत आणि पुढील पिढ्यांकरताही उपलब्ध राहतील.

☼

गुरुमाईंच्या जीवनाचे, गुरुमाईंच्या दिव्य वारशाचे परिमाण शब्दातीत आहे. व्याख्याने, भाष्ये अथवा पुस्तकांमध्ये यांना सामावले जाऊ शकत नाही — ते त्याच्याही पलीकडचे आहेत. स्पष्टपणे सांगायचे झाले तर, आपण आपल्या बौद्धिक क्षमतेने जितके आकलन करू शकू, ते त्याच्याही पलीकडचे आहेत.

तरीदेखील, आपल्याकडे आपल्या गोष्टी आहेत. आपल्याकडे गुरुमाईंकडून शिकवणी प्राप्त करण्याचे, गुरुमाईंच्या शब्दांमधून आणि त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीतून शिकण्याचे अनुभव आहेत. यांच्यापैकी प्रत्येक प्रसंग श्रीगुरुमाई कोण आहेत आणि त्या कशा प्रकारे शिकवतात याचा एक पैलू चित्रित करतो. हे प्रसंग एक प्रवेशद्वार आहेत ज्याद्वारे पुढील पिढ्या श्रीगुरुमाईंचे सान्निध्य लाभलेल्या सिद्धयोगींच्या दृष्टीने गुरुमाईंच्या प्रज्ञानाचा, त्यांच्या हास्याचा आणि त्यांच्या करुणेचा अनुभव घेतील.

या गोष्टींमधून आपल्याला हे ज्ञात होते की, प्रत्येक जिज्ञासूच्या जीवनावर, प्राणीमात्रावर व निसर्गावर तसेच संपूर्ण जगतावर गुरुमाईंच्या कृपेचा काय परिणाम होतो.

क्षणभर असा विचार करा की, आत्ता इथे, श्रीनिलयमध्ये आपल्याकडे गुरुमाईंच्या किती गोष्टी आहेत. तुमच्यापैकी प्रत्येकाकडेही किती गोष्टी असतील? आपण जर या हॉलमध्ये फिरलो आणि आपल्यातील प्रत्येकाच्या गोष्टी एकत्र करत गेलो तर, आपल्याकडे किती गोष्टी होतील? आणि मग, जर आपण सार्वभौमिक संघम्‌मधील सर्व सिद्धयोगींकडे असलेल्या त्यांच्या सर्व गोष्टीदेखील एकत्र केल्या तर काय होईल?

आता कल्पना करा की, ते चित्र कसे असेल जेव्हा सार्वभौमिक संघम्‌मधील सिद्धयोगी आपल्या सगळ्यांच्या गोष्टी एकत्र करतील. ती गुरुमाईंच्या जीवनाला आणि त्यांच्या दिव्य वारशाला अभिव्यक्त करणारी एक सुंदर कलाकृती आहे जिच्यात या गोष्टी एकमेकांमध्ये जडवल्या आणि सजवल्या आहेत.

अनेक प्रकारांनी गुरुमाईंचा दिव्य वारसा साधकांच्या हृदयांमध्ये जिवंत आहे — त्या सर्व हृदयांमध्ये ज्यांना गुरुमाईंच्या कृपेने, त्यांच्या शिकवणींनी आणि त्यांच्या उपस्थितीने खुले केले आहे; त्या जीवनांमध्ये ज्यांना गुरुमाईंनी कायमस्वरूपी बदलून टाकले आहे आणि त्या जीवनांना आणखीनच सुंदर बनवले आहे.

जरा विचार करा : तुम्ही गुरुमाईंची सर्वोत्कृष्ट कलाकृती आहात. तुम्ही गुरुमाईंची शक्ती, गुरुमाईंचे प्रेम आणि गुरुमाईंचे प्रज्ञान धारण केलेले आहे. तुम्ही गुरुमाईंसोबत घडलेले तुमचे प्रसंग जेव्हा सांगाल तेव्हा हाच बोध ठेवून आपल्या प्रसंगांचे कथन करा.

तुम्ही गुरुमाईंसोबत घडलेले तुमचे प्रसंग एकमेकांना आणि सार्वभौमिक संघम्‌ला जेव्हा सांगता तेव्हा तुम्ही गुरुमाईंचा दिव्य वारसा जिवंत ठेवता आणि भविष्यासाठी त्याचे जतन करता. असे करणे हे तुमचे मंगल उत्तरदायित्व आहे, असेदेखील तुम्ही समजू शकता.

तुम्ही जेव्हा तुमचे प्रसंग लिहिता तेव्हा तुम्ही तुमच्या अनुभवांची कलाकृती निर्माण करत असता जी अनंतकाळ उपलब्ध राहील. महत्त्वाचे हे आहे की, तुमचा प्रसंग सांगण्याइतपत योग्य आहे किंवा नाही याचा निवाडा तुम्ही करू नये. जर त्या प्रसंगाने तुमच्यावर प्रभाव टाकला असेल, जर त्या प्रसंगाने तुमच्या साधनेमध्ये विकास आणि रूपांतर घडवून आणले असेल, तर होय, तो निश्चितच उपयुक्त आहे.

मी तुम्हाला आमंत्रित करते की, गुरुमाईंच्या उपस्थितीचा महोत्सव साजरा करण्याच्या आनंदात, गुरुमाईंच्या दिव्य वारशाची महानता आणि त्यातील तुमची भूमिका लक्षात घेऊन तुम्ही गुरुमाईंसोबत घडलेल्या तुमच्या प्रसंगाचे कथन करावे.

© २०१७ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.